| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.७५६/२०१३ |
| सरकार -वि- शांता वगैरे |
| निशाणी क्र.५१ |

## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची शपथेवर सरतपासणी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | दिपक रामराव नंदनवार, |
| **वय** | : | ७० वर्ष |
| **धंदा** | : | सेवानिवृत्त, |
| **राहणार** | : | त्रिमुर्तीनगर, नागपूर |

## सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रियंका भा. झिरपे यांचेमार्फत

मी मार्च २०१४ मध्ये मी वनपरीक्षेत्र अधिकारी, (Range Forest Officer) सेमीनरी हिल्स, नागपूर या पदावरुन सेवानिवृत्त झालो. सन २०११ ते २०१४ पर्यंत मी सदर पदावर सेमीनरी हिल्स येथे कार्यरत होतो. वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून मी २४ तास कर्तव्यावर उपस्थित होतो. दिनांक ०६.१०.२०१२ रोजी मी विभागीय, उपवन संरक्षक कार्यालय, झिरोमाईल्स, नागपूर येथे हजर असतांना अजनी पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांनी त्याठिकाणी आरोपी शांताबाई सोळंकी आणि शंकर सोळंकी यांना आणले. तसेच त्यांनी एका पॉलीथीनमध्ये दोन हरणाचे शिंग आणि दोन काळविटचे शिंग आणले होते. सदर पोलीस अधिकारी यांनी सांगितले की, सदर दोन आरोपींच्या श्रीनगर, नागपूर येथील राहत्या घरुन पोलीसांनी सदर दोन हरणाचे शिंग व दोन काळविटचे शिंग घरझडतीमध्ये हस्तगत केले. सदर दोन आरोपींकडे कोणत्याही प्रकारचे परवाना नव्हते म्हणुन ते अवैद्यरित्या सदर शिंग आपल्या घरी ठेवलेले होते. सदर पोलीस अधिकारी यांनी माहिती दिल्यानंतर क्षेत्र सहायक मोहीते यांनी माझ्यासमक्ष मोका पंचनामा केला. सदर

पंचनाम्यानुसार वरील हरणाचे शिंग आणि काळविटाचे शिंग तसेच आरोपी यांना स्वत:च्या ताब्यात घेतले. मला आता मोका पंचनामा निशाणी ३१ दाखविण्यात आला. त्यावर पंच साक्षीदार पंचराम शाहु आणि राजेंद्र कुंभारे यांच्या सहया आहेत. तसेच त्यावर मोहिते साहेबांची व माझी सही आहे. तसेच त्यावर सहायक वन संरक्षक (Assistant Conservator of Forest) अंजीकर यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

२. मोहिते साहेबांनी सदर कारवाईबाबत सहा.वन संरक्षक अंजीकर व माझ्यासमक्ष साक्षीदारांचे जवाब नोंदविले. सदर हरणाचे व काळविटाचे शिंग Center for Cellular and Monicular Biology, Hydrabad यांच्याकडे परिक्षणासाठी पत्र दिनांक २२.०१.२०१३ रोजी माझ्या सहीने पाठविले. मला आता पत्र दिनांक २२.०१.२०१३ दाखविण्यात आले. मी पाठविलेले पत्र तेच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर पत्रावर वरिल केंद्रावर परिक्षणासाठी मुद्देमाल प्राप्त झाल्याचे संबंधीचा सही शिक्का आहे. त्यास **निशाणी ५२** देण्यात येते.

३. सदर परिक्षणासाठी आमच्या कार्यालयातर्फे शुल्काची रक्कम रु.२०,०००/- भरले होते. त्याबाबतच्या पावतीची मुळप्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यास **निशाणी ५३** देण्यात येते. सदर परिक्षणाचा अहवालाची मुळप्रत कव्हरींग लेटर अभिलेखावर निशाणी ४६ प्रमाणे दाखल आहे.

४. त्यानंतर मी सदर न्यायालयात लेखी टंकलिखीत तक्रार दिली. सदर तक्रार निशाणी १ वर आहे. त्यावर तक्रारदार म्हणून माझी सही आहे तसेच त्यावर मोहीते साहेबांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

५. तक्रारसोबत मी न्यायालयात हकीकत रोजनिशी, सहा.पोलीस निरिक्षक व्ही.एम. चौधरी यांनी दिलेली हस्तलिखीत तक्रार दिनांक ०६.१०.२०१२, घरझडती पंचनामा दिनांक ०६.१०.२०१२, मोका पंचनामा निशाणी ३१, पी.ओ.आर. निशाणी ४३, जप्तीपंचनामा निशाणी ३२, आरोपी व साक्षीदारांचे बयाण, हैदराबाद येथील परिक्षण केंद्राचे पत्र आणि अहवाल दाखल केले होते. आरोपींनी वन्यजीव संरक्षण खालील कायदयाचे कलम ३९, ४०(२) सहकलम ५१ यांचे उल्लंघन केल्याने सदर तक्रार मी दाखल केली. माझ्यासमक्ष मोहिते साहेबांनी जे हरणाचे व काळविटचे दोन शिंग जप्त केले, ते मला आता दाखविल्यास मी ओळखू शकेल. मला आता जप्त मुद्देमाल हरणाचे व काळविटचे प्रत्येकी दोन शिंग (आर्टीकल ए ते डी) दाखविण्यात आले. मोहीते साहेबांनी जप्त केलेले शिंग तेच आहेत. आरोपी शांता व शरद हे आज कोर्टासमक्ष हजर आहेत. मी त्यांना ओळखतो.

**सरतपास संपला**

**<u>उलट तपास आरोपींतर्फे अधिवक्ता श्री. चेतन ठाकूर यांचेमार्फत</u>**

६. पोलीसांनी ज्या पॉलीथीनमध्ये हरणाचे व काळविटचे शिंग आणले होते ते पॉलीथीन सिलबंद नव्हते. ते साध्या दोरीने बांधले होते. मोकापंचनामा निशाणी ३१ मोहीते साहेबांनी झीरोमाईल्स येथील कार्यालयात तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, मोका पंचनामा निशाणी ३१ वर दोन्ही आरोपींच्या सहया नाहीत.

७. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशन अजनीच्या पोलीस अधिकारी यांनी दोन्ही आरोपींना हरणाचे व काळविटचे प्रत्येकी दोन शिंगासह आणले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस अधिकारी यांच्या सांगण्यावरुन सदर मोका पंचनामा खोटा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मोहीते साहेबांनी माझ्यासमक्ष साक्षीदारांचे बयाण नोंदविले हे मी खोटे सांगत आहे. माझ्यासमक्ष मोहीते साहेबांनी पंचराम साहू व राजेंद्र

कुंभारे, अजनी पोलीस स्टेशने येथील पोलीस कर्मचारी चौधरी व ईतर दोन साक्षीदारांचे जवाब माझ्यासमक्ष नोंदविले होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचराम साहु आणि राजेंद्र कुंभारे हे मोका पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी वर सांगितल्याप्रमाणे कोणतीही कारवाई माझ्यासमक्ष मोहीते साहेबांनी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोका पंचनामा निशाणी ३१ मध्ये सदर हरणाचे व काळविटाचे शिंग जप्त करण्यात आल्याचे व सिलबंद करण्यात आल्याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त शिंग परिक्षणासाठी हैदराबाद येथे पाठविण्यात आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर तक्रारीसोबत जे काही दस्त दाखल केलेत ते सर्व दस्त खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमाल हा मी पहिल्यांदा कोर्टासमक्ष बघत आहे. कोर्टासमोरील दोन्ही आरोपी हे सन २०१२ मध्ये देखील आज जसे दिसतात आहेत तसेच दिसत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना आज खोटे ओळखले. हे म्हणणे खरे नाही की, मी या पुर्वी आरोपींना कधीही बघीतले नाही. कोर्टासमोर हजर केलेल्या जप्त मुद्देमालावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मुद्देमाल माझ्यासमक्ष जप्त करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**
**फेरतपास – नाही**

वा.दा.ब.असे कबुल केले
समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE
Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.01.09 11:25:58 +0530

(अनामिका दे. बोस)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक ०८.०१.२०२६